# परिक्रमा पर्यटनासाठी नसून प्रेरणेसाठी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे मोहीम

**कोल्हापूर, ता. २१ :** शिव पावन परिक्रमा ही पर्यटनासाठी नसून, प्रेरणेसाठी आहे. सहभागींनी या परिक्रमेतून आयुष्यभरासाठीचा प्रेरणेचा स्रोत स्वतःबरोबर घेऊन जावा, हाच यामागील उद्देश आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या दोनदिवसीय पन्हाळा ते पावनखिंड शिवपावन प्रेरणा परिक्रमेच्या प्रारंभप्रसंगी पन्हाळा येथे ते बोलत होते.



**कोल्हापूर : पन्हाळा ते पावनखिंड शिवपावन मोहिमेचा प्रारंभ शनिवारी झाला. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. एस. आर. पाटील, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. डी. के. गायकवाड आदी.**

आज सकाळी साडेसातला पन्हाळा येथील बाजीप्रभू देशपांडे व वीर शिवा काशीद यांच्या पुतळ्यांचे दर्शन घेऊन सुरू झालेल्या या मोहिमेची सांगता उद्या (ता. २२) सायंकाळी साडेसहाला पावनखिंड येथे होणार आहे. उद्घाटनप्रसंगी डॉ. शिंदे म्हणाले, की तत्कालीन परिस्थितीत कोणत्याही दळणवळणाच्या साधनांअभावी, विजेच्या सुविधेअभावी निव्वळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यावरील निष्ठेपोटी बाजीप्रभू देशपांडे आणि वीर शिवा काशीद यांनी आपली प्राणाहुती दिली. हा सारा इतिहास या दोन दिवसांच्या परिक्रमेत प्रत्येक सहभागीच्या मनामनांत जागला पाहिजे. ही परिक्रमा म्हणजे प्रेरणेचा झरा आणि ऊर्जेचा स्रोत जागृत करण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे.

परिक्रमेत राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, प्रा. पोपट माळी यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी आणि कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांमधून राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे १५० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत.

### विविध कार्यक्रम

परिक्रमेंतर्गत ऐतिहासिक माहिती घेण्याबरोबरच परिक्रमा मार्गावर स्वच्छता मोहीम, तसेच शाहिरी पोवाडा आदी प्रबोधन कार्यक्रमही घेण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2019
तरुण भारत

# शिव पावन परिक्रमा प्रेरणादायी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : पन्हाळा-पावनखिंड परिक्रमेला प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिव पावन परिक्रमा ही पर्यटनासाठी नसून प्रेरणादायी आहे. सहभागींनी या परिक्रमेतून आयुष्यभरासाठीचा प्रेरणेचा स्रोत स्वत:सोबत घेऊन जावे, हाच यामागील उद्देश आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित दोनदिवसीय पन्हाळा ते पावनखिंड शिव पावन प्रेरणा परिक्रमेच्या उद्घाटनप्रसंगी पन्हाळा येथे ते बोलत होते. शनिवारी सकाळी साडेसात वाजता पन्हाळा येथील बाजीप्रभू देशपांडे व वीर शिवा काशीद यांच्या पुतळ्यांचे दर्शन घेऊन सुरू झालेल्या या मोहिमेची सांगता रविवार सायंकाळी ६.३० वाजता पावनखिंड येथे होणार आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, तत्कालीन परिस्थितीमध्ये कोणत्याही दळणवळणाच्या साधनांअभावी, विजेच्या सुविधेअभावी निव्वळ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यावरील निष्ठेपोटी बाजीप्रभू देशपांडे आणि वीर शिवा काशीद यांनी आपली प्राणाहुती दिली. त्यांची निष्ठा आणि त्यांचे कार्य इतिहासात अमर झाले.

परिक्रमेत राष्ट्रीय सेवा योजन समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. एस.आर. पाटील, प्रा. पोपट माळी यांच्यासह कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यामधून राष्ट्रीय सेवा योजनेचे दीडशे स्वयंसेवक सहभागी झाले आहेत.

### ऊर्जेचा स्रोत

ही परिक्रमा म्हणजे पर्यटन नव्हे, तर याच प्रेरणेचा झरा आणि ऊर्जेचा स्रोत आपल्यामध्ये जागृत करण्याची संधी म्हणून विद्यार्थ्यांनी, स्वयंसेवकांनी आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पाहिले पाहिजे. त्यासाठीच या मोहिमेचे आयोजन केले आहे, असे डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

# विद्यापीठाची शिव पावन परिक्रमा पर्यटनासाठी नव्हे तर प्रेरणेसाठी

## कुलगुरू डॉ. शिंदे; पन्हाळा-पावनखिंड शिव पावन प्रेरणा परिक्रमेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिव पावन परिक्रमा ही पर्यटनासाठी नसून प्रेरणेसाठी आहे. सहभागींनी या परिक्रमेतून आयुष्यभरासाठीचा प्रेरणेचा स्रोत स्वत:सोबत घेऊन जावे, हा यामागील उद्देश आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित दोन दिवसीय पन्हाळा ते पावनखिंड शिव पावन प्रेरणा परिक्रमेच्या प्रारंभप्रसंगी पन्हाळा येथे ते बोलत होते. शनिवारी सकाळी पन्हाळा येथील बाजीप्रभू देशपांडे व वीर शिवा काशीद यांच्या पुतळ्यांचे दर्शन घेऊन परिक्रमेस सुरुवात झाली. मोहिमेची सांगता रविवारी सायंकाळी पावनखिंड येथे होणार आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दळणवळणाच्या साधनाअभावी, निव्वळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या



**कोल्हापूर : पन्हाळा-पावनखिंड शिव पावन प्रेरणा परिक्रमेत सहभागींसमवेत संवाद साधताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. प्राचार्य डॉ. एस.आर. पाटील, डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. डी.के. गायकवाड आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

स्वराज्य स्थापनेच्या कार्यावरील निष्ठेपोटी बाजीप्रभू देशपांडे आणि वीर शिवा काशीद यांनी प्राणाहुती दिली. त्यांची निष्ठा व त्यांचे कार्य परिक्रमेमध्ये प्रत्येक सहभागीच्या मनामनात जागला पाहिजे.

परिक्रमेत राष्ट्रीय सेवा योजन समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, प्रा. पोपट माळी आदी सहभागी झाले आहेत. परिक्रमेंतर्गत ऐतिहासिक माहिती घेण्याबरोबरच परिक्रमा मार्गावर स्वच्छता मोहीम तसेच शाहिरी पोवाडा आदी प्रबोधन कार्यक्रमही घेण्यात येणार आहेत.

# जितका संघर्ष मोठा तितकी मोठी संधी : डॉ. नमिता खोत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ग्रंथपालांना माहिती संप्रेषण व तंत्रज्ञानातील आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. कार्यरत असताना कराव्या लागणाऱ्या संघर्षाला संधी मानून त्या संधीचे सोने करावे, जितका मोठा संघर्ष तितकी मोठी संधी, त्यातूनच यशप्राप्ती होते, असे प्रतिपादन डॉ. नमिता खोत यांनी केले.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजमध्ये आयोजित ग्रंथपाल राष्ट्रीय कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

एच. टी. अपराध ग्रंथालय विभाग व शिवाजी विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथपाल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन ग्रंथपालाच्या विकासात व्यावसायिक आव्हाने व संधी या विषयावर महाविद्यालयीन ग्रंथपालासाठी राष्ट्रीय कार्यशाळा भरवण्यात आली होती. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी डी. जी. किल्लेदार होते. यानिमित्त डॉ. सुधीर नगरकर लिखीत 'युज ऑफ आय. सी. टी. फॉर क्वालिटी इनहाऊसमेंट ॲंड सस्टेनेबिलिटी इन लायब्ररीज' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी डॉ. आर. पी. आडाव, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रा. संध्या यादव, प्रा. महेश कांबळे, डॉ. सर्जेराव शेटके-पाटील उपस्थित होती. कार्यशाळेत ग्रंथपालांनी दैनंदिन व व्यावसायिक समस्यांबाबतच्या चर्चेत गोवा, कर्नाटक तसेच शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २०० ग्रंथपालांनी सहभाग घेतला.



**कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये आयोजित ग्रंथपाल राष्ट्रीय कार्यशाळेत उद्‌घाटक म्हणून बोलताना डॉ. नमिता खोत. सोबत डॉ. आर. पी. आडाव, डॉ. आर. जी. किल्लेदार, प्राचार्य व्ही. एम. पाटील, डॉ. बी. एस. पडवळ.**

# भारतीय समाजशास्त्र संस्थेच्या सचिवपदी डॉ. जगन कराडे

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** देशातील समाजशास्त्रज्ञांची शिखर



संस्था असलेल्या प्रतिष्ठित भारतीय समाजशास्त्र संस्थेच्या (इंडियन सोशियॉलॉजिकल सोसायटी, नवी दिल्ली) सचिवपदी शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांची निवड झाली. या पदावर निवड होणारे ते दुसरे महाराष्ट्रीयन आहेत. त्यांच्या निवडीमुळे विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. भारतीय समाजशास्त्र संस्थेचे जगभरात पाच हजार सदस्य आहेत. संस्थेच्या सचिवपदासाठी लखनौ विद्यापीठातील प्रा. डॉ. सुकांत चौधरी आणि डॉ. कराडे यांच्यात निवडणूक झाली. यात डॉ. कराडे ५४६ विरुद्ध ५०६ मतांनी विजयी झाले. ही निवड दोन वर्षासाठी आहे. महाराष्ट्रातून यापूर्वी माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे यांनी संस्थेचे सचिवपद भूषविले आहे. डॉ. कराडे यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ११ संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. महाराष्ट्रात कार्यरत मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले आहे. त्यांनी व्हिएन्ना (ऑस्ट्रिया), टोरोंटो (कॅनडा) व तैपेई (तैवान) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होऊन शोधनिबंध सादर केले आहेत. डॉ. कराडे यांच्या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी अभिनंदन केले आहे.

# तणावमुक्त जीवन जगण्यासाठी कला, कौशल्य आवश्यक

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आनंददायी व तणावमुक्त जीवन जगण्यासाठी आवडीनुसार कला, कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. कार्यालयीन कामकाजांमध्ये संघ भावना आणि सकारात्मक विचारांमुळे आदर्श कार्यप्रणाली निर्माण केल्यास कामांचा निपटारा जलदगतीने करणे शक्य आहे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांकरिता प्रशासकीय कौशल्ये वृद्धिंगत करण्याच्या दृष्टिकोनातून आयोजित निवासी प्रशिक्षण शिबिर पाचगणी येथे झाले. यावेळी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, प्रशासकीय पातळीवर कामे करीत असताना प्रशासकीय सेवक नेहमी जागरुक राहिला पाहिजेत. उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, अधिकाऱ्यांचा प्रशासकीय सेवकांसमवेत मुक्त संवाद होणे आवश्यक आहे. बहाई ॲकॅडमीचे संचालक डॉ. लेझन आझादी म्हणाले, सामाजिक व कार्यालयीन पातळीवर कामे करीत असताना प्रत्येकाने वैश्विक मानवी मूल्ये जोपासली पाहिजेत.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात पुणे येथील तज्ज्ञ साधन व्यक्ती रुचिरा घोरमारे व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी व्यवस्थापन कौशल्ये विकसित करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात विद्यापीठातील ५० हून अधिक प्रशासकीय सेवकांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2019
तरुण भारत

# समृद्ध ज्ञानासाठी विद्यार्थ्यांना प्रश्न पडले पाहिजेत

## डॉ. पी. एस. पाटील : सरलादेवी माने हायस्कूलमध्ये अटल टिंकरिंग लॅबचे उद्घाटन

प्रतिनिधी
कागल

आजचे विद्यार्थी हे परीक्षार्थी बनले आहेत. मात्र समृद्ध ज्ञानप्राप्तीसाठी विद्यार्थ्यांना सतत प्रश्न पडले पाहिजेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे विज्ञान विभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. येथील सरलादेवी यशवंतराव माने हायस्कूलमध्ये केंद्र सरकारच्या अटल टिंकरिंग लॅबचे उद्घाटन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी किरण लोहार होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचा देशातील पहिल्या दहामध्ये क्रमांक आल्याबद्दल डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. पी. एस. पाटील म्हणाले,



**कागल : टिंकरिंग लॅबच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करताना संस्था सचिव भैया माने. शेजारी शिक्षणाधिकारी किरण लोहार, उपशिक्षणाधिकारी किल्लेदार, देशपांडे, डॉ. शर्मिली माने, डॉ. प्रवीण चौगले.**

देशामध्ये ४० हजार महाविद्यालये असून सुमारे २० लाख माध्यमिक विद्यालये आहेत. या सर्वातून आपल्याला पुढे जायचे आहे. विद्यार्थ्यांना सातत्याने प्रश्न पडले पाहिजेत. केवळ अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न पडून चालणार नाहीत. विज्ञानाच्यादृष्टीने छोट्या-छोट्या गोष्टी शोधल्या पाहिजेत. अटल टिंकरिंग लॅबमुळे विद्यार्थ्यांच्या संशोधनात भर पडणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी माने यांच्या संस्थेसारख्या संस्था पुढे यायला हव्यात. केवळ मार्कासाठी अभ्यास न करता चांगला माणूस घडण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे, असे गटशिक्षणाधिकारी किरण लोहार म्हणाले.

सचिव भैया माने यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. अटल टिंकरिंग लॅबसाठी शासनाचे २० लाख रूपये मंजूर झाले आहेत. पैकी १२ लाख मिळाले असून उर्वरित आठ लाख रूपये पुढील चार वर्षे प्रत्येक वर्षी दोन लाख रूपये मिळणार आहेत.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका सविता माने यांनी केले. कार्यक्रमास अध्यक्ष व्ही. आय. देशपांडे, उपाध्यक्ष सुनील माने, डॉ. शर्मिली माने, शिल्पा पाटील, बिपीन माने, मांजी नगराध्यक्षा आशाकाकी माने उपस्थित होते.